BRIHANMUMBAI POLICE
बृहन्मुंबई पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

वरिष्ठ पोलीस निरीक्षक टिळकनगर पो.ठाणे,मुंबई.८९

# प्रेस नोट

**दुचाकी वरून मोबाईल खेचणाऱ्या सराईत आरोपींना टिळकनगर पोलीसांकडुन अटक.**

दिनांक २३/०७/२०२२ रोजी २१.३० वा चे सुमारास फिर्यादी श्री संकेत बेंगडे वय-१९ वर्षे हे राधिका रेसीडन्सी, टिळकनगर चेंबुर मुंबई याठिकाणाहून पायी चालत जात असताना अटक आरोपींनी त्यांचे हातातून त्यांचा वापरता रेड मी नोट १० प्रो कंपनीचा मोबाईल फोन व पुढे जावून श्रीमती सुनिता साळुंखे या महिलेचा तिच्या हातामधुन मोबाईल फोन जबरीने खेचुन ते मोटार सायकलस्वार भरधाव वेगात निघून गेले. तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीवरुन गु र क्र ६३८/२२, कलम-३९२,३४ भादवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

सदरचा गुन्हा घडताच मा. वपोनि सो टिळकनगर यांनी गुन्हा उघडकीस आणण्याच्या अनुशंगाने पोलीस उप निरीक्षक विजयसिंह देशमुख व गुन्हे प्रकटीकरण पथक यांना आवश्यक त्या सुचना व मार्गदर्शन केले. त्याप्रमाणे सदर पथकाने सीसीटीव्ही फुटेज ची पाहणी करून मोटार सायकलस्वार गुन्हेगार हे मानखुर्द लिंकरोड मुंबई च्या दिशेने गेले असल्याचे तपासात निष्पन्न केले व आरोपीतांच्या मिळालेल्या वर्णनावरुन गुप्त बातमीदारांना माहिती देण्यात आली. त्याप्रमाणे गुप्त बातमीदारा मार्फतीने माहिती मिळवून साध्या वेशात मानखुर्द लिंकरोड या ठिकाणी सापळा रचण्यात आला. गुप्त बातमीदार याने केलेल्या इशाऱ्यावरुन दोन इसमांना ताब्यात घेवून पोलीस ठाणेस आणले. त्यांचा तपास दरम्यान गुन्हयात सहभाग निष्पन्न झाल्याने त्यांना अटक करण्यात आली. नमुद गुन्हयातील फिर्यादी व महिला नामे सुनिता साळुंखे यांचे वापरते मोबाईल फोन कौशल्यपुर्वक तपास करून हस्तगत करण्यात आले. तसेच नमुद आरोपीतांकडून गोवंडी पोलीस ठाणे गु. र.क्र ४०६/२२, कलम-३७९ भादवि हा उघडकीस आणून मालमत्ता हस्तगत करण्यात आली आहे. सदरचा गंभीर स्वरूपाचा गुन्हा ४८ तासामध्ये उघडकीस आणण्यात यश प्राप्त केले.

**अटक आरोपी:**-१) कैस शमशाद अन्सारी, वय १९ वर्षे,धंदा नाही, रा.ठी. प्लॉट नं ०२, गौतमनगर, करबला मस्जिद जवळ, देवनार मुंबई २)दस्तगीर कयुम सयद, वय २५ वर्षे, धंदा नाही,रा.ठी. प्लॉट नं ०२, मेहफील वारसी, गौतमनगर, करबला मस्जिद जवळ, देवनार

सदरची कामगिरी श्री.विवेक फणसाळकर,पोलीस आयुक्त सो.बृहन्मुंबई,श्री विश्वास नांगरे -पाटील पोलीस सह आयुक्त सो. बृहन्मुंबई,श्री संजय दराडे अपर पोलीस आयुक्त सो.पुर्व प्रादेशिक विभाग,चेंबुर,मुंबई.,श्री कृष्णकांत उपाध्याय पोलीस उप-आयुक्त सो.परिमंडळ-०६,चेंबुर मुंबई.,सहायक पोलीस आयुक्त सो. श्री. नितिन जाधव यांचे मार्गदर्शनाखाली श्री सुनिल काळे वरिष्ठ पोलीस निरिक्षक, टिळकनगर पोलीस ठाणे,मुंबई.,श्री विलास राठोड पो.नि.गुन्हे, पो उ.नि. श्री.विजयसिंह देशमुख (गुन्हे प्रकटीकरण आधिकारी),पो.ह.पाटील, पो.ह. बनकर, पोशि पिंजारी, पो.शि. नागरगोजे पथकाने केली आहे.